[illegible] कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं - शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३३९/२०१०
दिनांक :- १६ /०७/२०१०

प्रति,
गुख्याध्यापिका,
किलबील प्रायमरी स्कूल,
पिंपळे गुरव, पुणे-२७

विषयः- इ. २ री ते इ. ७ वी पर्यंतचे प्रत्येकी प्रथम वर्गांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात मंजूरी देणेबाबत...

संदर्भः- १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि:- १४/०१/०३
२) आपणांकडील दिनांकः- १३/०७/२०१० चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडी खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदान तत्त्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १ | किलबील प्रायमरी स्कूल, पिंपळे गुरव, पुणे-२७ | इंग्रजी | इ. २ री ते इ. ७ ची पर्यंचे प्रत्येकी प्रथम वर्ग | नैसर्गिक | इ. २ री ते इ. ७ वी पर्यंतचे प्रत्येकी प्रथम वर्ग- २०१०-११ या शैक्षणिक वर्षात मंजूर. |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

<u>अटी व शर्ती :-</u>

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड.)
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४). शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुंकडीस विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) शाळेत आगप्रतिबंधक सुविधांची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८

प्रत:- १) माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

TRUE COPY

PRINCIPAL
KILBIL PRIMARY SCHOOL
PIMPLE GURAV PUNE-61

PRINCIPAL
KILBIL SECONDARY SCHOOL
PIMPLE GURAV